सत्यमेव जयते

भारत सरकार

कामगार व सेवायोजन मंत्रालय

# श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध नियम, १९५७

१९८३

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

[ किंमत : रु. १ ]

# श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध नियम, १९५७

## कामगार व सेवायोजन मंत्रालय

## अधिसूचना

नवी दिल्ली, दिनांक २३ मे १९५७

एसआरओ-१७३७.—'श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम १९५५' (१९५५ चा ४५) याच्या कलम २९ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर' करून केंद्र शासन याद्वारे पुढील नियम करत आहे :—

### नियम

### प्रकरण १

### प्रारंभिक

१. **संक्षिप्त नाव**:—या नियमांना 'श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध नियम, १९५७' असे म्हणता येईल.

२. **व्याख्या**.—या नियमांमध्ये संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,—

(क) "अधिनियम" याचा अर्थ 'श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५' (१९५५ चा ४५) असा आहे;

(ख) "प्राधिकृत वैद्यक व्यवसायी" याचा अर्थ, नियम २४ अन्वये प्राधिकृत वैद्यक व्यवसायी म्हणून पदनिर्देशित केलेला नोंदलेला वैद्यक व्यवसायी असा आहे, आणि जेव्हा असा कोणताही व्यवसायी पदनिर्देशित केला नसेल तेव्हा, कोणताही नोंदलेला वैद्यक व्यवसायी असा आहे;

(ग) "सरासरी वेतन" याचा अर्थ, 'औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७' (१९४७ चा १४) यामध्ये त्यास नेमून दिल्याप्रमाणे तोच अर्थ आहे;

(घ) "सक्षम अधिकारी" याचा अर्थ, नियम १७ अन्वये सक्षम अधिकारी म्हणून पदनिर्देशित केलेला अधिकारी असा आहे;

(ङ) "कुटुंब" याचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे :—

(एक) पुरुष श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत, पत्नी;

(दोन) स्त्री श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत, पती;

(तीन) मुलगे;

(चार) मुली;

(पाच) भाऊ व बहिणी;

(सहा) वडील; आणि

(सात) आई.

(च) "नमुना" याचा अर्थ, या नियमांना जोडलेला नमुना असा आहे;

(छ) "रजा" याचा अर्थ, अर्जित रजा, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा, प्रसूति रजा, असाधारण रजा, अनर्जित रजा, नैमित्तिक रजा, अध्ययन रजा किंवा संसर्गरोध रजा असा आहे;

(ज) "अर्जित रजा" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ७, खंड (क) अन्वये अनुज्ञेय असलेली रजा असा आहे;

(झ) "वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा" याचा अर्थ, अधिनियमाच्या कलम ७. खंड (ख) अन्वये अनुज्ञेय असलेली रजा असा आहे;

(ञ) "अनर्जित रजा" याचा अर्थ, जी रजा श्रमिक पत्रकारास देय नसेल परंतु नंतर अर्जित केली जाईल या अपेक्षेने त्यास देता येईल अशी रजा असा आहे;

(द) "संसर्गरोध रजा" याचा अर्थ, श्रमिक पत्रकाराच्या कुटुंबात किंवा परिवारात सांसर्गिक रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कामावर अनुपस्थित राहण्याची परवानगी असा आहे;

(ठ) "अध्ययन रजा" याचा अर्थ, श्रमिक पत्रकारास आपल्या पत्रकारितेच्या जीवनात उपयोगी पडेल असे कोणतेही विशेष प्रशिक्षण घेणे शक्य व्हावे म्हणून त्यास दिलेली रजा असा आहे;

(ड) "पाळ्या", 'दिवसपाळी' याचा अर्थ, ज्या पाळीतील कामाचे कोणतेही तास रात्री ११ ते सकाळी ५ या वेळेत येत नसतील अशी पाळी असा आहे; 'रात्रपाळी' याचा अर्थ, ज्या पाळीतील कामाचे कोणतेही तास रात्री ११ ते सकाळी ५ या वेळेत येतात अशी पाळी असा आहे.

## प्रकरण २

### उपदान

३. **उपदान देणे.**—श्रमिक पत्रकाराला किंवा त्याचा मृत्यू झाला असल्यास, त्याच्या वारसदारांना, उपदान देय झाल्यानंतर शक्यतितक्या लवकर, आणि कोणत्याही बाबतीत तीन महिन्यांच्या आत उपदान देण्यात येईल.

४. **मयत श्रमिक पत्रकारास देय असलेले उपदान कोणास द्यावयाचे.**—श्रमिक पत्रकारास मृत्यू आल्यावर,—

(क) त्याने नियम ५ अनुसार केलेली नामनियुक्ती अस्तित्वात असेल तर, अशा नामनियुक्तीनुसार त्याच्या नामनियुक्त व्यक्तीला किंवा व्यक्तींना उपदान देण्यात येईल; आणि

(ख) कोणतेही नामनियुक्तिपत्र अस्तित्वात नसेल किंवा ते नामनियुक्तिपत्र केवळ उपदानाच्या एखाद्या भागाशी संबंधित असेल तर उपदानाची रक्कम किंवा प्रकरणपरत्वे उपदानाच्या ज्या भागाशी नामनियुक्ती संबंधित नसेल असा भाग त्याच्या वारसदारांना देण्यात येईल.

५. **नामनियुक्तिपत्रे.**—(१) श्रमिक पत्रकाराला त्याची सतत तीन वर्षे इतका काळ नोकरी पूर्ण होताच, किंवा या अधिनियमाच्या प्रारंभपूर्वी ज्यांची सतत तीन वर्षे इतका काळ नोकरी पूर्ण झाली असेल अशांच्या बाबतीत, हे नियम अंमलात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर त्यांना या अधिनियमाखाली प्रदेय असणारी कोणतीही उपदानाची रक्कम प्रदेय होण्यापूर्वी, किंवा रक्कम प्रदेय झाली असेल तेव्हा तिचे प्रदान होण्यापूर्वी, आपला मृत्यू झाल्यास, ती रक्कम स्वीकारण्याचा हक्क प्रदान करण्यासाठी नमुना 'क' मध्ये नामनियुक्तिपत्र करावे लागेल.

(२) श्रमिक पत्रकारास, आपल्या नामनियुक्तिपत्रात, त्यास देय होईल अशी रक्कम स्वविवेकानुसार आपल्या नामनियुक्त व्यक्तींमध्ये वाटून देता येईल.

(३) जर नामनियुक्ती करतेवेळी श्रमिक पत्रकाराचे कुटुंब असेल तर, नामनियुक्ती त्याच्या कुटुंबातील एका किंवा त्याहून अधिक व्यक्तींच्या नावाने करावी लागेल. अशा श्रमिक पत्रकाराने त्याच्या कुटुंबात नसलेल्या व्यक्तीच्या नावाने केलेली कोणतीही नामनियुक्ती विधिबाह्य ठरेल.

(४) जर नामनियुक्ती करतेवेळी श्रमिक पत्रकाराचे कोणतेही कुटुंब नसेल तर, नामनियुक्ती कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावाने करता येईल, परंतु त्यानंतर तो कुटुंबवान् झाला तर, अशी नामनियुक्ती ताबडतोब विधिबाह्य झाल्याचे मानण्यात येईल आणि श्रमिक पत्रकाराला त्याच्या कुटुंबातील एका किंवा त्याहून अधिक व्यक्तींच्या नावाने नवीन नामनियुक्ती करावी लागेल.

(५) श्रमिक पत्रकारास, पोट-नियम (१) अन्वये केलेल्या नामनियुक्तीत किंवा, प्रकरणपरत्वे पोट-नियम (४) अन्वये केलेल्या नवीन नामनियुक्तीत, फेरबदल करावयाचा असल्यास नमुना 'ख' मध्ये तसे करण्याविषयीच्या आपल्या उद्देशाची लेखी नोटीस दिल्यानंतर, तसे करता येईल. जर नामनियुक्त व्यक्ती श्रमिक पत्रकाराच्या अगोदर मृत्यू पावली तर, नामनियुक्त व्यक्तीचा हितसंबंध श्रमिक पत्रकाराकडे प्रत्यावर्तित होईल आणि श्रमिक पत्रकारास या नियमांनुसार नवीन नामनियुक्ती करता येईल.

(६) नामनियुक्तिपत्र किंवा त्यातील फेरबदल, वृत्तपत्र आस्थापनेस ज्या तारखेस मिळाले असेल त्या तारखेस ते ज्या मर्यादेपर्यंत विधिग्राह्य असेल त्या मर्यादेपर्यंत परिणामक होईल.

६. **उपदानातून वजाती करणे.**—असे उपदान ते देण्यास दायी असलेल्या वृत्तपत्र आस्थापनेने श्रमिक पत्रकारास अतिप्रदान केले असल्यास त्याबद्दल आणि श्रमिक पत्रकाराने अशा वृत्तपत्र आस्थापनेकडून उसनवार घेतलेल्या पैशांबद्दल त्यांमधून वजाती केल्या जाण्यास पात्र असेल.

## प्रकरण ३

### कामाचे तास

७. **संपादक, इत्यादी संबंधी विशेष उपबंध.**—(१) या प्रकरणाचे उपबंध संपादकांना, किंवा वृत्तप्रतिनिधी, वार्ताहर किंवा वृत्तछायाचित्रकार यांना लागू असणार नाहीत.

(२) पोट-नियम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, (ज्याच्या संबंधात अशी कोणतीही व्यक्ती नोकरीत असेल असे) वृत्तपत्र ज्या ठिकाणी प्रकाशित करण्यात येत

असेल त्या ठिकाणी काम करत असलेला प्रत्येक वृत्तप्रतिनिधी, वार्ताहर किंवा वृत्त-छायाचित्रकार यांना पुढील उपबंध लागू असतील :—

(क) संबंधित पक्षांमध्ये सामुदायिकरीत्या किंवा व्यक्तिश: करण्यात येईल अशा कराराच्या अधीनतेने, असा प्रत्येक वृत्तप्रतिनिधी, वार्ताहर किंवा वृत्तछायाचित्रकार हा कोणत्याही दिवशी तो एकदा कामावर हजर झाला की, त्या दिवशी त्यास नेमून दिलेले सर्व काम तो पूर्ण करीपर्यंत तो संपूर्ण दिवसभर कामावर असल्याचे मानण्यात येईल:

परंतु, अशा वृत्तप्रतिनिधीस, वार्ताहरास किंवा वृत्तछायाचित्रकारास, नेमून दिलेल्या कोणत्याही दोन किंवा अधिक कामांच्या दरम्यान एकूण दोन तासांचे किंवा त्याहून कमी अवधीचे कोणतेही मध्यंतर किंवा मध्यंतरे विश्रांतीसाठी दिलेली असतील तर, तो अशा अवधीत कामावर असल्याचे मानण्यात येणार नाही:

परंतु आणखी असे की, अशा मध्यंतराचा किंवा मध्यंतरांचा एकूण अवधी दोन तासांपेक्षा अधिक होईल तेव्हा, उक्त दोन तासांच्या अवधीपेक्षा अधिक असलेल्या अवधीत तो कामावर असल्याचे मानण्यात येईल;

(ख) कोणत्याही आठवडचात (या पोट-नियमाच्या प्रयोजनांसाठी हे कामाचे युनिट म्हणून समजण्यात येईल) छत्तीस तासांपेक्षा अधिक होणाऱ्या कामाच्या कोणत्याही अवधीची, लगेच पुढच्या आठवडचात विश्रांती देऊन भरपाई करण्यात येईल आणि ती प्रत्येकी किमान तीन तासांच्या अशा एका किंवा अधिक अवधीत देण्यात येईल ;

परंतु, जास्तीचे काम केलेले एकूण तास तीन तासांपेक्षा कमी असतील तेव्हा, विश्रांतीचा अवधी हा अशा जास्तीच्या तासांइतकाच मर्यादित असेल.

८. **नेहमीचा कामाचा दिवस.**—भोजनाची वेळ वगळून श्रमिक पत्रकाराचा नेहमीचा कामाचा दिवस हा, दिवसपाळीच्या बाबतीत दररोज सहा तासांपेक्षा अधिक असणार नाही आणि रात्रपाळीच्या बाबतीत दररोज साडेपाच तासांपेक्षा अधिक असणार नाही, आणि सामान्यत: कोणत्याही श्रमिक पत्रकारास नेहमीच्या कामाच्या दिवसांच्या तासांपेक्षा अधिक काळ काम करावयास लावले जाणार नाही किंवा तशी मुभा दिली जाणार नाही.

९. **विश्रांतीसाठी मध्यंतर.**—वृत्तपत्र आस्थापना आणि त्या आस्थापनेत नोकरीस असलेले श्रमिक पत्रकार यांच्यामध्ये करण्यात येईल अशा कराराच्या अधीनतेने, श्रमिक पत्रकारांसाठी कामाचे अवधी अशा रीतीने ठरविण्यात येतील की, कोणत्याही श्रमिक पत्रकारास दिवसपाळीच्या बाबतीत एक तास आणि रात्रपाळीच्या बाबतीत अर्धा तास विश्रांतीचे मध्यंतर मिळाल्या-शिवाय त्यास दिवसपाळीच्या बाबतीत चार तासांपेक्षा आणि रात्रपाळीच्या बाबतीत तीन तासांपेक्षा अधिक वेळ काम करावे लागणार नाही.

१०. **अतिकालिक कामाबद्दल भरपाई.**—श्रमिक पत्रकार कोणत्याही दिवशी, दिवस-पाळीच्या बाबतीत सहा तासांपेक्षा आणि रात्रपाळीच्या बाबतीत साडेपाच तासांपेक्षा अधिक वेळ काम करील तेव्हा, त्यास त्या अतिकालिक कामाच्या बाबतीत, त्याने जितके तास अधिक काम केले असेल तितक्या तासांची विश्रांती देऊन त्या स्वरुपात भरपाई करण्यात येईल.

११. **रात्रपाळ्यांचे नियमन करणाऱ्या शर्ती.**—कोणत्याही श्रमिक पत्रकारास एकावेळी एक आठवड्यापेक्षा अधिक काळ किंवा कोणत्याही चौदा दिवसांच्या कालावधीमध्ये एक आठवड्यापेक्षा अधिक काळ सलगपणे रात्रपाळीचे काम देता येणार नाही :

परंतु, विशेष परिस्थितीमुळे तसे करणे आवश्यक असेल तेव्हा या नियमात विहित केलेली मर्यादा राज्य कामगार आयुक्तांच्या किंवा राज्य शासनाने याबाबत नियुक्त केलेल्या कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने वाढवता येईल.

१२. **पाळी बदलण्यापूर्वीचे मध्यंतर.**—रात्रपाळीतून दिवसपाळीत किंवा त्याउलट क्रमाने पाळीबदल होईल अशा बाबतीत, त्या दोन पाळ्यांच्या दरम्यान किमान सलग चोवीस तास इतक्या अवधीचे मध्यंतर असावे लागेल आणि एका दिवसपाळीतून दुसऱ्या दिवसपाळीत किंवा एका रात्रपाळीतून दुसऱ्या रात्रपाळीत पाळीबदल होईल अशा बाबतीत, किमान सलग बारा तास इतक्या अवधीचे मध्यंतर असावे लागेल :

परंतु, असे मध्यंतर, श्रमिक पत्रकाराने अधिनियमाच्या कलम ६, पोट-कलम (२) अन्वये घेतलेल्या मध्यंतराबरोबर तितका काळ येत असेल किंवा अशा मध्यंतरातच येत असेल तर, असे कोणतेही मध्यंतर घेण्यास मुभा दिली जाणार नाही.

## प्रकरण ४

## सुटया

१३. **वर्षातील सुट्टयांची संख्या.**—श्रमिक पत्रकारास एका कॅलेंडर वर्षात दहा सुटया घेण्याचा हक्क असेल.

१४. **बदली सुट्टया.**—श्रमिक पत्रकारास एखाद्या सुटीच्या दिवशी कामावर येणे भाग पडले असेल तर, त्या सुटीनंतरच्या तीस दिवसांच्या आत, त्याने त्याच्या नियोक्त्याने परस्परांनी ठरवलेल्या एखाद्या दिवशी त्यास बदली सुटी देण्यात येईल.

१५. **सुट्टयांबद्दल वेतन.**—श्रमिक पत्रकारास सर्व सुटयांच्या दिवसांबद्दल, जणू काही तो तेव्हा कामावर असावा त्याप्रमाणे वेतन मिळण्याचा हक्क असेल.

१६. **साप्ताहिक विश्रांतीच्या दिवसाबद्दल वेतन.**—श्रमिक पत्रकारास साप्ताहिक विश्रांतीच्या दिवसांबद्दल जणू काही तो तेव्हा कामावर असावा त्याप्रमाणे वेतन मिळण्याचा हक्क असेल.

## प्रकरण ५

## रजा

१७. **सक्षम अधिकारी.**—प्रत्येक वृत्तपत्र आस्थापनेस, या प्रकरणाच्या प्रयोजनांसाठी सक्षम अधिकारी म्हणून त्या आस्थापनेतील एक किंवा अधिक अधिकारी पदनिर्देशित करता येतील.

१८. **रजेसाठी अर्ज.**—(१) अनुपस्थितीची परवानगी मिळवू इच्छिणाऱ्या श्रमिक पत्रकाराला सक्षम प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करावा लागेल.

(२) नैमित्तिक रजा, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा आणि संसर्गरोध रजा याव्यतिरिक्त अन्य रजेसाठी करावयाचा अर्ज रजेच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी कमीत कमी एक महिना अगोदर करावा लागेल—मात्र तातडीची किंवा अकल्पित परिस्थिती असेल तर गोष्ट अलाहिदा.

१९. **रजा नाकारण्याची किंवा पुढे ढकलण्याची कारणे नमूद करणे.**—जर रजा नाकारण्यात आली किंवा पुढे ढकलण्यात आली तर, सक्षम अधिकारी अशा रीतीने रजा नाकारण्याची किंवा, प्रकरणपरत्वे, पुढे ढकलण्याची कारणे नमूद करील आणि आदेशाची एक प्रत श्रमिक पत्रकाराकडे पाठवील.

२०. **सुट्ट्या रजेस जोडून घेणे.**—साप्ताहिक विश्रांतीच्या दिवसांव्यतिरिक्त अन्य सुट्या सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय कोणत्याही रजेच्या मागे किंवा पुढे जोडून घेता येणार नाहीत.

२१. **रजेच्या कालावधीमध्ये येणाऱ्या सुट्ट्या.**—या नियमांन्वये दिलेल्या कोणत्याही रजेच्या मध्ये येणारी सुटी-साप्ताहिक विश्रांतीचा दिवस धरून हा रजेच्या कालावधीचाच एक भाग असेल.

२२. **रजा संपण्यापूर्वी परत बोलावणे.**—(१) वृत्तपत्र आस्थापना, तसे त्या आस्थापनेस आवश्यक वाटले तर, रजेवर असलेल्या श्रमिक पत्रकारास परत बोलावू शकेल. अशा रीतीने परत बोलावण्यात येईल तेव्हा, असा श्रमिक पत्रकार परत बोलावण्याच्या वेळी त्याच्या मुख्यालयाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी आपली रजा व्यतीत करत असेल तर, त्यास प्रवासभत्ता मिळण्याचा हक्क असेल.

(२) श्रमिक पत्रकारास पोट-नियम (१) अन्वये द्यावयाचा प्रवासभत्ता हा, वृत्तपत्र आस्थापनेच्या ज्या नियमांद्वारे श्रमिक पत्रकारांनी त्यांच्या कार्यालयीन कामाच्या ओघात केलेल्या प्रवासाबद्दलच्या प्रवासभत्त्याचे नियमन केले जाते त्या नियमांस अनुसरून निश्चित करण्यात येईल.

२३. **कामावर रुजू होण्यापूर्वी स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करणे.**—ज्याने, प्रकृतीच्या कारणांसाठी रजा घेतलेली आहे अशा श्रमिक पत्रकारास त्याचा नियोक्ता, त्याला कामावर रुज होण्यापूर्वी प्राधिकृत वैद्यक व्यवसायीचे स्वास्थ्य प्रमाणपत्र सादर करावयास लावू शकेल.

२४. **प्राधिकृत वैद्यक व्यवसायीस पदनिर्देशित करणे.**—प्रत्येक वृत्तपत्र आस्थापनेस, या नियमांच्या प्रयोजनांसाठी प्राधिकृत वैद्यक व्यवसायी म्हणून एक किंवा अधिक नोंदलेले वैद्यक व्यवसायी पदनिर्देशित करता येतील.

२५. **अर्जित रजा.**—(१) श्रमिक पत्रकारास, कामावर व्यतीत केलेल्या दर अकरा महिन्यागणिक कमीत कमी एक महिना इतक्या कालावधीची भरपगारी अर्जित रजा मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, देय अर्जित रजा नव्वद दिवसांइतकी होईल तेव्हा, त्यास अशी रजा अर्जित होण्याचे बंद होईल.

(२) कामावर व्यतीत केलेल्या कालावधीमध्ये साप्ताहिक विश्रांतीचे दिवस, सुट्या, नैमित्तिक रजा आणि संसर्गरोध रजा यांचा समावेश असेल.

२६. **अर्जित रजेतील वेतन.**—अर्जित रजेवर असलेल्या श्रमिक पत्रकारास, त्याने कामावर व्यतीत केलेल्या बारा पूर्ण महिन्यांच्या कालावधीत, किंवा असा कालावधी बारा पूर्ण महिन्यांपेक्षा कमी असेल तर ज्या महिन्यात रजेस प्रारंभ होत असेल त्या महिन्याच्या निकटपूर्वीच्या अशा संपूर्ण कालावधीत त्याने मिळवलेल्या त्याच्या सरासरी मासिक वेतनाइतके वेतन मिळेल.

२७. **न घेतलेल्या अर्जित रजेबद्दल रोख भरपाई.**—(१) श्रमिक पत्रकार स्वेच्छेने आपले पद सोडून देईल किंवा वयोनिवृत्तीचे वय झाल्यावर सेवानिवृत्त होईल तेव्हा, त्यास कमाल तीस दिवसांपर्यंत न घेतलेल्या अर्जित रजेबद्दल रोख भरपाई मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, ज्या श्रमिक पत्रकारास त्याला देय असलेली अर्जित रजा नाकारण्यात आली असेल त्याला अशा रीतीने नाकारण्यात आलेल्या अर्जित रजेबद्दल रोख भरपाई मिळण्याचा हक्क असेल :

परंतु आणखी असे की, जो श्रमिक पत्रकार नोकरीत असताना मरण पावला असेल आणि ज्याने त्याच्या मृत्यूच्या तारखेच्या निकटपूर्वी त्यास देय असलेली अर्जित रजा घेतली नसेल त्याच्या बाबतीत, त्याच्या वारसदारांना अशा रीतीने न घेतलेल्या रजेबद्दल रोख भरपाई मिळण्याचा हक्क असेल.

(२) शिस्तभंगाच्या कार्यवाहीदाखल शिक्षा म्हणून नव्हे तर अन्य कोणत्याही कारणासाठी श्रमिक पत्रकाराची नोकरी समाप्त करण्यात आली असेल तेव्हा, त्यास कमाल नव्वद दिवसांपर्यंत न घेतलेल्या अर्जित रजेबद्दल रोख भरपाई मिळण्याचा हक्क असेल.

(३) ही रोख भरपाई न घेतलेल्या रजेच्या कालावधीबद्दल श्रमिक पत्रकारास देय असलेल्या वेतनाच्या रकमेपेक्षा कमी असणार नाही आणि संबंधित वेतन हे, पोट-नियम (१) किंवा, प्रकरणपरत्वे, (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या घटनांपैकी कोणतीही घटना घडण्याच्या निकटपूर्वीच्या दिवशी तो प्रत्यक्षात रजेवर गेला असता तर त्यास जे वेतन प्रदेय झाले असते असे वेतन असेल.

२८. **वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा.**—(१) श्रमिक पत्रकारास, नोकरीच्या दर अठरा महिन्यांगणिक कमीत कमी एक महिना इतक्या दराने वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे अर्धपगारी रजा मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा ही नव्वद दिवसांइतकी होईल तेव्हा, त्यास अशी रजा अर्जित होण्याचे बंद होईल.

(२) वैद्यकीय प्रमाणपत्र हे, प्राधिकृत वैद्यक व्यवसायांचे असावे लागेल.

(३) वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा ही अर्जित रजेला जोडून घेता येईल, परंतु अर्जित रजा आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी रजा मिळून एकूण कालावधी हा कोणत्याही एकावेळी एकशेवीस दिवसांपेक्षा अधिक होता कामा नये.

(४) श्रमिक पत्रकारास वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे मिळणारी अर्धपगारी रजा ही स्वतःच्या मर्जीनुसार त्या रजेच्या निम्म्याइतक्या दिवसांची भरपगारी रजा म्हणून रुपांतरित करून घेण्याचा हक्क असेल.

(५) रजा साचवण्यावर आणि रजेच्या एकूण कालावधीवर पोट-नियम (१) चे परंतुक आणि पोट-नियम (३) यांमध्ये घालून दिलेली कमालमर्यादा ही, सक्षम अधिकाऱ्यास, क्षयरोगासारख्या दीर्घकाळ रेंगाळणाऱ्या रोगाने आजारी असलेल्या श्रमिक पत्रकाराच्या बाबतीत शिथिल करता येईल.

२९. **प्रसूति रजा.**—(१) एखादी श्रमिक पत्रकार स्त्री त्या त्या वेळी ती जेथे नोकरीस आहे त्या वृत्तपत्र आस्थापनेत तिची कमीत कमी एक वर्ष इतका काळ नोकरी झाली असेल तर अशा स्त्रीला, रजेच्या प्रारंभाच्या तारखेपासून तीन महिने किंवा प्रसूतीच्या तारखेपासून सहा आठवडे, यापैकी जो आधी संपणारा असेल त्या कालावधीपर्यंत भरपगारी प्रसूति रजा देण्यात येईल.

(२) अन्य कोणत्याही प्रकारची रजा देखील प्रसूति रजेस जोडून देता येईल.

(३) अशा बाबतीत स्त्रीचा गर्भस्त्राव झाल्यास त्या प्रकरणी गर्भपाताच्या प्रकरणीसुद्धा रजा सहा आठवड्यांपेक्षा अधिक होता कामा नये या शर्तीवर प्रसूति रजा देण्यात येईल.

३०. **संसर्गरोध रजा.**—नियम २४ अन्वये प्राधिकृत वैद्यक व्यवसायी म्हणून पदनिर्देशित केलेल्या प्राधिकृत वैद्यक व्यवसायीच्या प्रमाणपत्राच्या आधारे, किंवा, असा कोणताही प्राधिकृत वैद्यक व्यवसायी नसेल तेव्हा, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याच्या किंवा त्याच दर्जाच्या अन्य नगरपालिका आरोग्य अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राच्या आधारे वृत्तपत्र आस्थापनेकडून जास्तीत जास्त एकवीस दिवस किंवा अपवादात्मक परिस्थितीत, तीस दिवस इतक्या कालावधीची भरपगारी संसर्गरोध रजा देण्यात येईल. संसर्गरोधाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली त्या कालावधीपेक्षा अधिक अशी कोणतीही रजा ही, श्रमिक पत्रकारास देय असेल अशा अन्य कोणत्याही रजेमधून वळती करण्यात येईल.

३१. **असाधारण रजा.**—ज्या श्रमिक पत्रकाराच्या जमेस कोणतीही रजा नसेल अशा श्रमिक पत्रकारास, तो ज्या वृत्तपत्र आस्थापनेत नोकरी करत असेल त्या वृत्तपत्र आस्थापनेच्या स्वविवेकानुसार बिनपगारी असाधारण रजा देता येईल.

३२. **अनर्जित रजा.**—ज्या श्रमिक पत्रकाराच्या जमेस कोणतीही रजा नसेल अशा श्रमिक पत्रकारास, तो ज्या वृत्तपत्र आस्थापनेत नोकरी करत असेल त्या वृत्तपत्र आस्थापनेच्या स्वविवेकानुसार अनर्जित रजा देता येईल.

३३. **अध्ययन रजा.**—श्रमिक पत्रकारास, तो ज्या वृत्तपत्र आस्थापनेत नोकरी करत असेल त्या वृत्तपत्र आस्थापनेच्या स्वविवेकानुसार भरपगारी किंवा बिनपगारी अध्ययन रजा देता येईल.

३४. **नैमित्तिक रजा.**—(१) श्रमिक पत्रकार, वृत्तपत्र आस्थापनेच्या स्वविवेकानुसार एका कॅलेंडर वर्षात पंधरा दिवस इतक्या नैमित्तिक रजा मिळण्यास पात्र असेल.

परंतु, कोणत्याही एका वेळी पाच दिवसांपेक्षा अधिक नैमित्तिक रजा घेता येणार नाही आणि अशा रजा अन्य कोणत्याही रजेस जोडून घेता येणार नाही.

(२) कॅलेंडर वर्षात न घेतलेली नैमित्तिक रजा पुढील वर्षासाठी जमेस धरता येणार नाही.

३५. **नैमित्तिक रजेतील वेतन.**—नैमित्तिक रजेवर असलेल्या श्रमिक पत्रकारास, जणू काही तो कामावर असावा त्याप्रमाणे पगार मिळण्याचा हक्क असेल.

## प्रकरण ५

### संकीर्ण

३६. **अधिनियमाच्या कलम १७ अन्वये करावयाचे अर्ज.**—(१) अधिनियमाच्या कलम १७ अन्वये करावयाचा अर्ज हा, श्रमिक पत्रकार ज्या वृत्तपत्र आस्थापनेत नोकरी करत असेल त्या आस्थापनेचे मुख्यालय किंवा तिची शाखा ज्या ठिकाणी असेल तेथील राज्य शासनाकडे करण्यात येईल.

(२) कलम १७ अन्वये केलेल्या कोणत्याही अर्जावर निर्णय देण्यापूर्वी, राज्य शासन किंव त्या कलमान्वये राज्य शासनाने याबाबत विनिर्दिष्ट केले असेल असे प्राधिकरण, संबंधित पक्षांना आपापली बाजू मांडण्याची वाजवी संधी देईल.

३७. **निरीक्षकांची नियुक्ती.**—राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, एका किंवा अधिक निरीक्षकांची नियुक्ती करू शकेल आणि प्रत्येक निरीक्षकास ते स्वत:ला योग्य वाटेल असे अधिकार क्षेत्र नेमून देऊ शकेल. आपापल्या अधिकार क्षेत्रातील सर्व वृत्तपत्र आस्थापनांकडून अधिनियमाचे आणि त्याखालील नियमांचे उपबंध आणि अधिनियमाखाली स्थापन केलेल्या वेतन मंडळाचे कोणतेही निर्णय असल्यास ते निर्णय यांची पूर्णपणे अंमल-बजावणी केली जाईल अशी खात्रीशीर व्यवस्था करणे हे अशा प्रत्येक निरीक्षकाचे कर्तव्य असेल. त्यास कोणत्याही वृत्तपत्र आस्थापनेत प्रवेश करता येईल, आणि आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी करता येईल व अशी माहिती गोळा करता येईल.

३८. **या नियमांशी विसंगत अशा नियमांची व करारांची परिणामकता.**—या नियमावलीचे उपबंध, श्रमिक पत्रकारास लागू असलेल्या अन्य कोणत्याही नियमात किंवा करारात किंवा सेवा-संविदेत या नियमावलीशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरी, परिणामक असतील :

परंतु, श्रमिक पत्रकारास एखाद्या बाबतीत या नियमावली अन्वये जे फायदे मिळण्याचा हक्क असेल त्यापेक्षा अधिक अनुकूल असतील असे फायदे मिळण्यास तो असा कोणताही नियम, करार किंवा सेवा-संविदा याअन्वये किंवा अन्यथा हक्कदार असेल तेव्हा, त्या श्रमिक पत्रकारास त्यास तेवढ्या बाबतीत अधिक अनुकूल फायदे मिळण्याचा हक्क असण्याचे चालू राहील. मग अन्य बाबतीत त्याला या नियमावली अन्वये फायदे मिळत असले तरी हरकत नाही.

# नमुना 'क'

**"श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५" याच्या कलम ५ अन्वये उपदानाच्या प्रदानासाठी नामनियुक्तिपत्राचा नमुना.**

नियम ५ (१)

१. नाव : .................... आडनाव (असल्यास) ................

२. स्त्री की पुरुष : ..............

३. धर्म : ....................

४. व्यवसाय : ...............

५. वडिलांचे नाव : ..............

६. पतीचे नाव : ...............
(केवळ विवाहित स्त्रियांसाठी)

७. विवाहविषयक दशा—
(अविवाहित, प्रौढ कुमारी, विवाहित, विधवा की विधुर)

८. जन्मतारीख दि. ...... माहे .......... वर्ष ..........

९. कायमचा पत्ता :

गाव ............ ता. ........... जिल्हा .......... राज्य ..........

मी याद्वारे, खाली नमूद केलेल्या व्यक्तीस/व्यक्तींना, माझ्या नावे जमा असलेली उपदानाची रक्कम प्रदेय होण्यापूर्वी, किंवा प्रदेय झाल्यावर तिच्या प्रदानापूर्वी माझा मृत्यू झाल्यास, ती रक्कम स्वीकारण्यास नामनियुक्त करत आहे आणि असा निदेश देत आहे की, सदर रक्कम उक्त व्यक्तींमध्ये, खाली त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रीतीने वाटण्यात यावी :—

| नामनियुक्त व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे नाव आणि पत्ता | नामनियुक्त व्यक्तीचे श्रमिक पत्रकाराशी नाते | नामनियुक्त व्यक्तीचे वय | प्रत्येक नामनियुक्त व्यक्तीस द्यावयाची उपदानाच्या हिश्श्याची रक्कम | कोणते प्रसंग घडल्यानंतर नामनियुक्ती विधिबाह्य ठरेल |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक ...............

श्रमिक पत्रकाराची सही.

प्रमाणित करण्यात येते की, वरील नामनियुक्तिपत्रावर ........................
(येथे वृत्तपत्र आस्थापनेचे नाव नमूद करावे) येथे नोकरीस असलेल्या, ..............

स्वत: नोंदी वाचल्यानंतर
यांनी, ———————————— माझ्या समक्ष सही केली आहे.
त्यांना मी नोंदी वाचून दाखवल्यानंतर

दिनांक ..............

साक्षीदाराची सही (१) ................

दिनांक ..............

साक्षीदाराची सही (२) ................

दिनांक ............

वृत्तपत्र आस्थापनेतील जबाबदार अधिकाऱ्याची सही.

हुद्दा ..................

वृत्तपत्र आस्थापनेचे नाव व पत्ता.

## नमुना ' ख '

### "श्रमिक पत्रकार (सेवाशर्ती) आणि संकीर्ण उपबंध अधिनियम, १९५५" याच्या कलम ५ अन्वये उपदानाच्या प्रदानासाठी नामनियुक्तिपत्राचा नमुना

नियम ५ (५)

माझा मृत्यू झाल्यास माझ्या नावे जमा असलेल्या उपदानाच्या रकमेची विल्हेवाट कशी करावी त्यासंबंधी मी दिनांक                रोजी केलेले नामनियुक्तिपत्र मी, ············ याद्वारे रद्द करत आहे आणि याद्वारे, खाली नमूद केलेल्या व्यक्तीस/व्यक्तींना, माझ्या नावे जमा असलेली उपदानाची रक्कम प्रदेय होण्यापूर्वी, किंवा प्रदेय झाल्यावर तिच्या प्रदनापूर्वी माझा मृत्यू झाल्यास, ती रक्कम स्वीकारण्यास नामनियुक्त करत आहे आणि असा निदेश देत आहे की, सदर रक्कम उक्त व्यक्तींमध्ये, खाली त्यांच्या नावांसमोर दर्शवलेल्या रीतीने वाटण्यात यावी :—

| नामनियुक्त व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे नाव आणि पत्ता | नामनियुक्त व्यक्तीचे श्रमिक पत्रकाराशी नाते | नामनियुक्त व्यक्तीचे वय | प्रत्येक नामनियुक्त व्यक्तीस द्यावयाची उपदानाच्या हिश्श्याची रक्कम | कोणते प्रसंग घडल्यानंतर नामनियुक्ती विधिबाह्य ठरेल |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | | | |

दिनांक ·····················                श्रमिक पत्रकाराची सही.

प्रमाणित करण्यात येते की, वरील नामनियुक्तिपत्रावर ...................
(येथे वृत्तपत्र आस्थापनेचे नाव नमूद करावे) येथे नोकरीस असलेल्या ...................
यांनी माझ्या समक्ष सही केली आहे.

दिनांक .................

वृत्तपत्र आस्थापनेतील जबाबदार अधिकाऱ्याची सही.

साक्षीदाराची सही (१) ...............

दिनांक ...............

हुद्दा ....................

साक्षीदाराची सही (२) ...............

दिनांक ...............

वृत्तपत्र आस्थापनेचे नाव व पत्ता :

(क्रमांक डब्ल्यूजे/दोन/एक/५६.)

**विष्णु सहाय,**

**सचिव.**